# प्रेस नोट ता.३०/०९/२०२०

# महागडे मोबाईल हिसकावुन जबरी चोरी करणा-या गुन्हेगारास अटक करुन सुमारे ३,६४,०००/-रु किंमतीचा ऐवज जप्त

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**एकुण ३,६४,०००/- रु किंमतीचे २३ मोबाईल फोन व गुन्हयातील पल्सर मोटारसायकल जप्त**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात घडणा-या मोबाईल हिसकावुन चोरीच्या गुन्हयांबाबत मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश यांनी विशेष सुचना देवून चोरटयांचा शोध घेवून कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट २ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड व पथक पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणेंकडे दाखल गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार व स्टाफ असे पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी मुंढे, अतिश कुडके, यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, नागरिकांचे मोबाईल फोन हिसकावुन चोरीचे गुन्हे करणारा गुन्हेगार संजय गजानन मरगुरे रा. घरकुल चिखली हा कॉलेटी सर्कल गवळीमाथा येथे येणार असल्याची माहीती मिळालेने त्या ठिकाणी युनिट २ चे पोलीस उपनिरीक्षक एस.डी.निलपत्रेवार,पोहवा माने, स्वामी, खरात, पोना चेतन मुंढे, विपुल जाधव, शिवाजी मुंढे, अतिश कुडके, अजित सानप, नामदेव कापसे यांनी सापळा लावुन संशयित चोरटा संजय गजानन मरगुरे यास त्याचेकडील पल्सर मोटर सायकल व चोरीचे मोबाईलसह शिताफीने ताब्यात घेवून गुन्हे शाखा कार्यालयात आणुन चौकशी करता त्याने व त्याचा साथीदार अक्षय चव्हाण रा.घरकुल चिखली अशांनी पल्सर मोटर सायकलचा वापर करुन मोहननगर, जाधववाडी, मोशी,

चिखली, भोसरी, भोसरी एमआयडीसी, चिंचवड, निगडी, रावेत परीसरातुन नागरिकांचे एकुण २३ महागडे मोबाईल हिसकावुन घेवून चोरी केल्याचे कबुल केले. अटक आरोपी संजय मरगुरे याचे कब्जातून ३६४०००/- रुपये किंमतीचा मुदेमाल हस्तगत करुन पुढील तपास कामी भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ४३७/२०२० भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल गुन्हयाचेकामी ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, वसंत खोमणे, मपोहवा उषा दळे, पोना विपूल जाधव, चेतन मुंढे, जमिर तांबोळी पोकॉ नामदेव कापसे, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,तांत्रिक विश्लेषक पोहवा राजेद्र शेटटे,पोना नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.